1) म. टा. पु. पान क्र. 1

दि. 31/01/2023

# वर्षभरात ५४६ विनयभंग

## दररोज सरासरी एकाहून अधिक घटना; गुन्हेउकलीचे प्रमाण ९६ टक्के

**म. टा. वृत्तसेवा, वसई**

मिरा-भाईंदर-वसई-विरार पोलिस आयुक्तालयाच्या अंतर्गत २०२२ या वर्षात महिलांवरील विनयभंगाच्या घटनांमध्ये वाढ झाल्याचे समोर आले आहे. २०२१ या वर्षात ४१४ विनयभंगाच्या गुन्ह्यांची नोंद झाली होती. मात्र २०२२ या वर्षात ५४६ गुन्ह्यांची नोंद झाली असून ही संख्या १३२ने वाढल्याचे दिसून आले आहे. मात्र या गुन्ह्यातील उकलीचे प्रमाणही वाढले आहे. घडलेल्या गुन्ह्यांपैकी एकूण ९६ टक्के गुन्ह्यांची उकल करण्यात पोलिसांना यश आल्याची माहिती पोलिसांनी दिली.

मिरा भाईंदर-वसई-विरार पोलिस आयुक्तालयाच्या हद्दीत प्रत्येक महिन्याला महिलांशी संबंधित हिंसाचाराचे गुन्हे उघडकीस येत आहेत. यामध्ये हत्या, बलात्कार, विनयभंग, अपहरण अशा गुन्ह्यांचा समावेश आहे. महिलांबाबत गुन्ह्यात सर्वाधिक गुन्हे विनयभंगाचे नोंदले असल्याची माहिती पोलिसांनी दिली. २०२१मध्ये विनयभंगाचे ४१४ गुन्हे विविध पोलिस ठाण्यात नोंद करण्यात आले आहेत. २०२०च्या तुलनेत २०२१मध्ये ही संख्या ६२ने वाढल्याचे समोर आले होते. मात्र २०२२ या वर्षात ५४६ विनयभंगाचे गुन्हे दाखल झाले असून ही संख्या २०२१च्या तुलनेत १३२ने वाढली आहे. त्यामुळे महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

पोलिस आयुक्तालयामार्फत मिळालेल्या माहितीनुसार, सन २०२२मध्ये ५४६ विनयभंगाच्या घटना नोंद झाल्या असल्या तरी दुसरीकडे या गुन्ह्यातील ९६ टक्के गुन्ह्यांची उकल करण्यात पोलिसांना यश आले आहे. म्हणजेच ५२४ गुन्ह्यांतील आरोपींवर कारवाई केली आहे. तर, २०२१ या वर्षात घडलेल्या ४१४ विनयभंगाच्या गुन्ह्यांपैकी ४०२ गुन्ह्यांची उकल झाली आहे. त्याचे प्रमाण ९७ टक्के आहे. एकीकडे पोलिस आयुक्तालयाने गुन्ह्यांची उकल करण्याची टक्केवारी मागील दोन वर्षांत वाढल्याचा दावा केला असला तरी महिलांवरील गुन्हे कमी करण्यात पोलिस अपयशी ठरल्याचे दिसून येत आहे. पोलिस आयुक्तालयाच्या अंतर्गत वाढत्या गुन्हेगारीसह महिलांवरील अत्याचार कायम असून महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे, हे पोलिस ठाण्यात नोंद असलेल्या घटनांवरून दिसून येत आहे.

### बहुतांश आरोपींना अटक

विनयभंग या गुन्ह्यातील बहुतांश घटनांमध्ये भर रहदारीच्या ठिकाणी महिलांसोबत अश्लील वर्तवणूक करणे, अश्लील बोलणे, संबंध नसतानाही स्पर्श करणे तसेच, घरातील व ऑनलाइन पद्धतीने झालेल्या विनयभंगाच्या प्रकारांचा समावेश आहे. त्यामुळे पोलिसांनी या गुन्ह्यांतील बहुतांश आरोपींना अटक केली असली, तरी हे गुन्हे घडण्यापासून कसे रोखायचे, या मोठा प्रश्न पोलिसांसमोर आहे.



2) म. टा. पु. 1

# मिरा-भाईंदरमध्ये ९० टक्के मतदान

**म. टा. वृत्तसेवा, मिरा-भाईंदर**



कोकण विभाग शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी मिरा-भाईंदरमधील मतदान केंद्रावर ९० टक्के मतदान झाले. या केंद्रावर सोमवारी सकाळपासूनच मतदारांच्या मतदानासाठी रांगा लागल्या होत्या. या निवडणुकीत राजकीय पक्षांचे व अपक्ष असे एकूण आठ उमेदवार रिंगणात आहेत.

विधान परिषदेच्या कोकण शिक्षण मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी मिरा-भाईंदर मध्ये भाईंदर पश्चिमेला असणाऱ्या तहसीलदार कार्यालय येथील केंद्रावर सोमवारी मतदान पार पडले. येथील केंद्रावर मिरा-भाईंदर परिसरातील एक हजार ७९ मतदारांची नोंद आहे. ह्या केंद्रावर दुपारी दोनपर्यंत ७० टक्के, म्हणजे ७३६ मतदारांनी मतदान केले होते. दुपारी चारपर्यंत ९०.७३ टक्के, म्हणजेच ९७९ मतदारांनी मतदान केले.

ह्या केंद्रावर मतदान प्रक्रिया शांततेत व सुरळीत पार पडली कोणताही अनुचित प्रकार घडला नाही. ही निवडणूक महाविकास आघाडीचे उमेदवार बाळाराम दत्तात्रय पाटील व भाजप आणि शिंदे गटाचे ज्ञानेश्वर बारकू म्हात्रे यांच्यात अटीतटीची लढत आहे. या निवडणुकीचा निकाल सोमवारी जाहीर केला जाणार आहे.

## वसई तालुक्यात ८० टक्के मतदान

**वसई :** कोकण शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी सोमवारी वसई तालुक्यात सायंकाळी चार वाजेपर्यंत एकूण ८० टक्के मतदान झाले होते.

वसईतील एकूण तीन हजार ७२४ मतदारांपैकी सायंकाळी चार वाजेपर्यंत तीन हजार ७ मतदारांनी मतदान केले. पालघर जिल्ह्यात ६,७१८ मतदार असून त्यामध्ये वसई तालुक्यात ३,७२४ मतदार आहेत. त्यापैकी चार वाजेपर्यंत एकूण तीन हजार सात मतदारांनी मतदान केले असून यामध्ये ७८ टक्के महिला मतदारांचा समावेश आहे तर ९० टक्के पुरुष मतदारांचा समावेश आहे.

3) म. टा. पु. 1

## गोईलकर यांना राष्ट्रपती पदक

**वसई :** विरार पोलिस ठाण्यात कार्यरत असलेले पोलिस उपनिरीक्षक सुभाष गोईलकर यांना नुकतेच राष्ट्रपती पदक जाहीर झाले आहे. मिरा-भाईंदर-वसई-विरार पोलिस आयुक्तालयाच्या स्थापनेनंतर गोईलकर यांना हा पुरस्कार जाहीर झाल्याने सर्व पोलिसांसाठी ही अभिमानास्पद बाब ठरली आहे. केंद्रीय गृहमंत्रालयाकडून नुकतीच पोलिस पदकांची घोषणा करण्यात आली आहे. महाराष्ट्र पोलिस सेवेत ७ डिसेंबर १९९१ रोजी पोलिस कॉन्स्टेबल म्हणून सुभाष गोईलकर सेवेत दाखल झाले होते. १० मार्च २००५ रोजी त्यांना पोलिस नाईक, २५ ऑक्टोबर २०११ रोजी हेड कॉन्स्टेबल, १ ऑक्टोबर २०१८ रोजी सहाय्यक पोलिस निरीक्षक तर ५ जुलै २०२२ रोजी पोलिस उपनिरीक्षकपदी बढती मिळाली. सध्या ते विरार पोलिस ठाण्यात उपनिरीक्षकपदावर कार्यरत आहेत. गोईलकर यांची पोलिस सेवेत ३१ वर्षे झाली आहेत. या कालावधीत त्यांना अनेक पुरस्कार मिळाले आहेत.

CamScanner

4) लोकसत्ता पु. पान क्र.4 दि. 31/01/2023

# सोनसाखळी चोरीचे गुन्हे घटले

## वसई-विरार शहरात २०२२ मध्ये ३५ घटनांची नोंद

**लोकसत्ता, विशेष प्रतिनिधी**

**वसई :** सोनसाखळी चोरीचे गुन्हे आटोक्यात आणण्यात पोलिसांना यश आले आहे. २०२१ च्या तुलनेत सोनसाखळी चोरीच्या घटनांमध्ये मोठी घट झाली आहे. २०२१ मध्ये सोनसाखळी चोरीच्या १०१ घटना घडल्या होत्या, तर २०२२ मध्ये ३५ घटनांची नोंद झाली आहे.

रस्त्याने जाणाऱ्या महिलांच्या गळ्यातील सोनसाखळी खेचून पळण्याच्या घटना गेल्या काही वर्षांत वाढल्या होत्या. सकाळच्या वेळी मंदिरात तसेच फेरफटका मारण्यासाठी जाणाऱ्या, लग्नसमारंभासाठी जाणाऱ्या महिला तसेच ज्येष्ठ नागरिकांना लक्ष्य केले जात होते. त्याचबरोबर चाकूचा धाक दाखवून सोनसाखळी लुटण्याचे प्रकारही घडले होते. त्यामुळे नागरिकांमध्ये घबराट पसरली होती. त्यामुळे हे गुन्हे रोखण्यासाठी पोलिसांनी विशेष मोहीम हाती घेतली होती. जागोजागी नाकाबंदी, गस्त वाढविण्यात आली होती. तसेच जनजागृती करण्यात येत होती. गुन्हे शाखेनेदेखील अनेक सोनसाखळी करणाऱ्या टोळ्यांना अटक केली होती. त्याचा सकारात्मक परिणाम दिसून आला.

२०२२ या वर्षात सोनसाखळी चोरीच्या ३५ घटना घडल्या. त्यापैकी २० गुन्ह्यांची उकल करून आरोपींना पकडण्यात यश आले आहे. २०२१ मध्ये सोनसाखळी चोरीच्या १०१ घटना घडल्या होत्या. त्यातील केवळ ७५ घटनांची उकल करण्यात आली होती.

याबाबत माहिती देताना पोलिसांनी सांगितले की, 'सोनसाखळी चोरीच्या घटना रोखण्यासाठी तत्कालीन पोलीस आयुक्त सदानंद दाते यांनी विशेष नियोजन केले होते. त्यानुसार सकाळी आणि सायंकाळी वेळी गर्दीच्या तसेच निर्जन ठिकाणी गस्ती वाढवून पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. जागोजागी सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यात आले होते. त्यामुळे चोरांवर अंकुश बसला आहे. पोलिसांच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेने तसेच गुन्हे शाखेने सोनसाखळी करणाऱ्या टोळ्यांना अटक केली होती. यातील अनेक चोरांवर मोक्का कायद्यान्वये कारवाया करण्यात आल्याने सोनसाखळी चोरीच्या घटना कमी झाल्या आहेत. २०२२ या वर्षात घडलेल्या ३५ गुन्ह्यांपैकी २० गुन्ह्यांची उकल झाली असून उर्वरित गुन्ह्यांचीही लवकरच उकल केली जाईल.'

### काय काळजी घ्यावी?



मंगळसूत्र किंवा सोनसाखळी घालून बाजारात जाताना चोरटे दागिने हिसकावण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे दागिने घातल्यानंतर महिलांनी सावध राहणे आवश्यक आहे. प्रभात फेरीसाठी, बाजारात किंवा मंदिरात जाणाऱ्या महिलांनी किंवा तरुणींनी कमीत कमी दागिन्यांचा वापर करावा. तसेच गळ्यामध्ये शाल, मफलर किंवा ओढणी घ्यावी, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

**सोनसाखळी चोरीच्या घटना**

| वर्ष | दाखल | उघड |
|---|---|---|
| २०२१ | १०१ | ७५ |
| २०२२ | ३५ | २० |

5) लोकसत्ता पु. पान क्र. 4

# तरुणीच्या आत्महत्येप्रकरणी दोन तरुणांना अटक

**वसई :** नायगावमधील सॅसिया परेरा (२१) हिच्या आत्महत्येप्रकरणी वसई पोलिसांनी दोन तरुणांना अटक केली आहे. या तरुणांनी सॅसियाला संदेश पाठवून तसेच अश्लील शेरेबाजी करून त्रास दिल्याने तिने आत्महत्या केल्याचा आरोप तिच्या वडिलांनी केला होता.

नायगाव येथील किरवली गावात राहणाऱ्या सॅसिया हिने ४ जानेवारी रोजी घरात गळफास घेऊन आत्महत्या केली होती. आत्महत्येच्या दिवशी ती व्यथित होती. तिला एबल डिसोजा आणि सेवन घोन्साल्विस हे दोन तरुण सातत्याने फोन आणि संदेश पाठवत होते. ते असह्य झाल्याने तिने आपले जीवन संपवले, असा आरोप सॅसियाचे वडील नॉरमन परेरा यांनी केला होता. त्या रात्री दोघांनी तिला मेसेज पाठवून अश्लील शेरेबाजी केली होती. तसेच तिच्या चारित्र्यावर ठपका ठेवला होता. बदनामीच्या भीतीपोटी तिने आत्महत्या केल्याचे वडिलांनी तक्रारीत म्हटले होते. या प्रकरणी वसई पोलिसांनी दोन्ही तरुणांना अटक केली असून त्यांना ३१ जानेवारीपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.

CamScanner

6) म. टा. पू. पान क्र. 1

दि. 31/01/2023

# रुग्णालय खासगीकरणास विरोध

## राजकीय नेत्यांसह सामाजिक संघटना आक्रमक

म. टा. वृत्तसेवा, मिरा-भाईंदर

मिरा-भाईंदरच्या शासकीय पंडित भीमसेन जोशी रुग्णालयास सुविधा पुरवल्याकडे राज्य शासनाकडून दुर्लक्ष केले जात असल्याने रुग्णांची गैरसोय होत आहे. ह्या पार्श्वभूमीवर हे रुग्णालय सार्वजनिक व खासगी भागीदारांच्या मदतीने पीपीपी तत्त्वावर चालवण्याचा विचार केला जात आहे. याला राजकीय नेत्यांसह सामाजिक संघटनांकडून आता तीव्र विरोध दर्शवला जाऊ लागला आहे. काही संघटनांनी हे रुग्णालय खासगी संस्थांच्या हाती दिल्यास आंदोलन करू, असा इशारा दिला आहे.



### भाजप, राष्ट्रवादीही पीपीपीच्या विरोधात

रुग्णालय सुस्थितीत चालवण्यासाठी शासनाकडून निधीची आणि त्यासाठी पाठपुराव्याची गरज आहे. पीपीपी तत्त्वावर रुग्णालय चालवून तोडगा निघणार नाही. काही केल्या रुग्णालय खासगी भागीदारीद्वारे चालू देणार नाही, असे मत भाजपचे माजी आमदार नरेंद्र मेहता यांनी व्यक्त केले. राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष अरुण कदम यांनीदेखील रुग्णालय शासनानेच चालवावे, अशी मागणी लावून धरत विरोध दर्शवला आहे.

मिरा-भाईंदरमधील पंडित भीमसेन जोशी रुग्णालय करोना काळानंतर पूर्ण क्षमतेने राज्य शासनाकडून चालवले जात आहे. तत्पूर्वी रुग्णालयाच्या निर्मितीपासून ते पालिकेमार्फत चालवले जात होते. परंतु, रुग्णालयावर होणारा अधिकचा खर्च परवडत नसल्याने ते राज्य शासनाकडे चांगल्या सुविधा मिळतील, या अपेक्षेने हस्तांतरित करण्यात आले होते, मात्र हस्तांतरणानंतरही या रुग्णालयात आवश्यक मनुष्यबळ व निधी उपलब्ध करून देण्याकडे राज्य शासनाकडून मागच्या काही वर्षांत दुर्लक्ष केले जात आहे.

रुग्णालय प्रशानामार्फत उपलब्ध मनुष्यबळाच्या आधारे साध्या शस्त्रक्रिया केल्या जात आहे. उर्वरित शस्त्रक्रिया किंवा उपचारांसाठी खासगी रुग्णालयांवर अवलंबून राहावे लागत असल्याने गरीब व गरजू नागरिकांची गैरसोय होत आहे. ह्या पार्श्वभूमीवर स्थानिक आमदार गीता जैन यांनी हे रुग्णालय सार्वजनिक आणि खाजगी भागीदारीद्वारे चालवण्याचा पर्याय पुढे करत त्या संदर्भात नुकतीच आरोग्य मंत्री तानाजी सावंत यांनी भेट घेतली होती.

ही कार्यवाही करण्यास आता मिरा-भाईंदरमधील राजकीय नेते मंडळी आणि सामाजिक संघटनांकडून तीव्र विरोध दर्शवला जात आहे. ह्या रुग्णालयावर शहरातील ७० टक्के गरीब व गरजू लोक अवलंबून आहेत. असे असताना खासगी भागीदारी घेतल्यास सर्वसामान्य रुग्णांना उपचार घेणे खर्चिक होणार असल्याचे मत श्रमजीवी संघटनेकडून व्यक्त करण्यात आले. यासंदर्भात रस्त्यावर उतरून आंदोलन करू, असा इशारा त्यांच्याकडून देण्यात आला आहे.

7) पुण्यनगरी पू. पान क्र. 1

# भाईंदरमध्ये 'पठाण'ची पोस्टर्स फाडली

**मीरा रोड :** भाईंदर पश्चिमेच्या मॅक्सस मॉल चित्रपटगृहातील तिकीट खिडकीबाहेर लावलेली पठाण सिनेमाची पोस्टर्स बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांनी फाडत तोडफोड केली. यातील ९ कार्यकर्त्यांना पोलिसांनी ताब्यात घेतले असून तोडफोड करणाऱ्यांवर भाईंदर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. भाईंदर पश्चिमेच्या मॅक्सस सिनेमागृहात 'पठाण' चित्रपट प्रदर्शित झाला आहे. पठाण हा सिनेमा प्रदर्शित झाल्यापासून या सिनेमाला हिंदुत्ववादी संघटनांकडून विरोध केला जात आहे. त्याचेच पडसाद मीरा-भाईंदर शहरात उमटले. भाईंदर पश्चिमेला असलेल्या मॅक्सस सिनेमागृहाच्या तिकीट खिडकीबाहेर लागलेली पोस्टर्स बजरंग दलाच्या १५ ते २० कार्यकर्त्यांनी फाडली व दगडफेक करत काचेची तोडफोड केली. यावेळी हे कार्यकर्ते 'वंदे मातरम' व 'जय श्रीराम' अशा घोषणा देत होते. काही वेळात पोलिसांनी घटनास्थळी दाखल होत ९ जणांना ताब्यात घेतले. इतर कार्यकर्त्यांचा शोध सुरू आहे. या चित्रपटात 'बेशरम रंग' गाण्यामध्ये दीपिकाने परिधान केलेल्या भगव्या रंगाच्या बिकिनीवर आक्षेप घेत चित्रपटातील काही दृश्ये काढण्याची मागणी केली होती. अन्यथा पठाण चित्रपट बॉयकॉट करणार, असा इशारा दिला होता. डिसेंबर महिन्यामध्ये पठाण चित्रपटामधील 'बेशरम रंग' गाणे प्रदर्शित झाल्यानंतर वाद सुरू झाला होता. या आंदोलनानंतर चित्रपटगृहाबाहेर पोलीस बंदोबस्त वाढवण्यात आला आहे.

CamScanner

८) पुढारी पृ. पान क्र. ३

दि. ३१/०१/२०२३

# वेश्याव्यवसाय करणाऱ्या आरोपीस अटक

**मिरारोड :** मिरारोड परिसरात वेश्याव्यवसाय करवून घेणाऱ्या एका दलाल महिलेसह एका पुरुष दलालाला अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, भाईंदर यांनी अटक केली आहे. त्यांच्या तावडीतून एका पीडित महिलेची सुटका करण्यात आली आहे.

अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, भाईंदर यांना माहिती मिळाली की मालाड येथे राहणारी जिनत नामक एक महिला वेश्याव्यवसाय करीत असून ती गिऱ्हाईकांना तिच्या व्हॉटसअॅप मोबाईल क्रमांकावरून मुलीचे फोटो पाठवुन मिरा-भाईंदर परिसरातील लॉजमध्ये गिऱ्हाईकास रूम बुक करावयास सांगुन वेश्यागमनाचा मोबदला घेवून वेश्यागमनासाठी मुली पुरवते. मिळालेल्या माहितीनुसार समीर अहिरराव, पोलीस निरिक्षक, अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, भाईंदर यांनी सापळा रेचून वेश्यादलाल महिला आरोपी जिनत हीला एका मिरारोड येथील एका हॉटेल आणि लॉजिंग बोर्डींग या ठिकाणी तिचा साथीदार अॅटो रिक्षा चालक सद्दाम हुसेन यांनी वेश्यागमनासाठी आणलेल्या एका महिलेसह ताब्यात घेतले. त्यांच्याकडे चौकशी केली असता पीडित महिलेला वेश्यादलाल जिनत व तिचा साथीदार सुद्दाम हुसेन तसेच आरोपी सोनू व पिन्टु यांनी पीडित महिलेस पैशाच्या मोबदल्यात वेश्यागमनासाठी प्रवृत्त करून पाठविले असल्याचे निष्पन्न झाले. महिला वेश्यादलाल जिनत व सद्दाम हुसेन यांना सापळा कारवाई करुन रोख रक्कम व इतर मुद्देमालासह पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. त्या पीडित महिलेची सुटका करण्यात आली आहे. या आरोपी विरुद्ध मिरारोड पोलीस ठाण्यात भा.दं.वि.सं.कलम ३७०,३४ सह अ. व्या. प्रति अधि. १९५६ चे कलम ४, ५ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

मिरारोड-भाईंदर परिसरात नायजेरियन टोळ्यांचा उपद्रव सुरू आहेच, शिवाय वेश्याव्यवसायही चोरीछुपे सुरूच आहे. नागरिकांनी केलेल्या तक्रारीवरुन गेल्या वर्षभरात पोलीस प्रशासनाने कडक कारवाई करत वेश्याव्यवसायाला चाप लावला होता. मात्र पुन्हा एकदा वेश्याव्यवसायाने डोके वर काढलेय. मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय हद्दीत पोलिस प्रशासनाने कारवाईचा बडगा उगारला आहे.

९) पुढारी पृ. पान क्र. १

# काशीमिरात मेमसाब लेडिज बारवर पोलिसांची धाड

मिरारोड : काशिमिरा पोलीस ठाणे हद्दीतील पेणकर पाडा परिसरात मेमसाब लेडीज ऑर्केस्टा बारवर पोलिसांनी छापा टाकून कारवाई केली. या कारवाईत ११ जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

काशिमिरा पोलिसांना पेणकरपाडा येथील मेमसाब लेडीज सर्व्हिस ऑर्केस्टा बारमध्ये गाण्यावर अश्लील नृत्य सुरू असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार पोलिसांनी पथकासह त्या बारमध्ये छापा टाकला असता बारमध्ये गाण्यावर ३ महिला सिंगर या तोडके व तंग कपडे परिधान करुन अश्लील नृत्य करुन हॉटेलमधील उपस्थित ग्राहकांना आकर्षित करीत होत्या. त्यासाठी हॉटेलमधील मॅनेजर, चालक, कॅशिअर, वेटर हे महिलांना अश्लिल नृत्य करण्यासाठी प्रोत्साहीत करीत होते.

तसेच बारमधील ३ ग्राहक हे देखील त्या महिलांना अश्लील नृत्य करण्यास प्रोत्साहीत करत होते. तसेच ते ग्राहक भारतीय चलनातील नोटा महिलांच्या अंगावर उडवुन प्रोत्साहन देत होते. तर बारचे मालक, चालक व मॅनेजर, कॅशिअर, स्टुअर्ट व वेटर हे प्रोत्साहन देत होते. तसेच ग्राहक बारमधील सिंगर महिलांसोबत अश्लिल हावभाव व अंगविक्षेप करत असतांना मिळून आले. त्यामुळे त्यांच्या विरोधात भा.द.वि.स. कलम २९४, ११४, १०९, ३४ सह महाराष्ट्र हॉटेल व उपहार गृह आणि मद्यपान कक्ष (बार रुम) यामधील अश्लील नृत्यांवर प्रतिबंध घालण्याबाबत व महीलांच्या प्रतिष्ठेचे संरक्षण करण्याबाबत अधिनियम २०१६ चे कलम ८ ( ४ ) प्रमाणे काशिमिरा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

CamScanner

दि. 31/01/2023

10) लोकमत पान क्र. 10

## आर्थिक विवंचनेतून महिलेने केली आत्महत्या

लोकमत न्यूज नेटवर्क

मीरा रोड : पतीच्या निधनानंतर तीन मुलांची जबाबदारी आणि व्यवसायात आलेल्या अपयशामुळे आर्थिक विवंचनेत असलेल्या महिलेने दुपट्ट्याने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना भाईंदरमध्ये उघडकीस आली आहे. सपना हितेश मिस्त्री (३७) असे मृत महिलेचे नाव आहे.

भाईंदर पूर्वेच्या आरएनपी पार्कमध्ये सपना या राहत होत्या. सपनाचे पती हितेश यांचे चार महिन्यांपूर्वी २२ सप्टेंबरला हृदयविकाराने निधन झाले होते. त्यामुळे त्यांच्यावर सुहानी (१७), दिव्या (८) व मोहित (६) या तीन मुलांची जबाबदारी होती. दीड महिन्यांपूर्वी तिने दुकान भाड्याने घेऊन पतीच्या नावाने फास्ट फूड व्यवसाय सुरू केला होता. मात्र, त्यांना अपेक्षित यश मिळत नव्हते. त्यामुळे आर्थिक चणचण जाणवत असल्याने ती मुलांच्या भवितव्याबाबत चिंतित होती. यातूनच तिने आत्महत्येचा मार्ग पत्करल्याची शक्यता व्यक्त होत आहे.

11) लोकमत पान क्र. 10

## अल्पवयीन मुलाची गळफास लावून आत्महत्या

नालासोपारा : नायगाव येथे १४ वर्षांच्या अल्पवयीन मुलाने गळफास लावून आत्महत्या केल्याची घटना घडली आहे. नायगावच्या वाकीपाडा येथील आस्था वेल्फेअर सोसायटीत राहणाऱ्या किरण सहानी याने रविवारी रात्री आठच्या सुमारास राहत्या घरात लोखंडी पाइपला ओढणीच्या साहाय्याने गळफास लावून आत्महत्या केली. वालीव पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे.

**अल्पवयीन मुलीचा विनयभंग**

पंधरा वर्षीय अल्पवयीन मुलीचा विनयभंग केल्याची घटना समोर आली आहे. अलकापुरी रोड येथे राहणारी मुलगी शाळेत जात असताना परिसरातील आरोपी तरुण मागील तीन वर्षांपासून तिच्याशी जवळीक साधण्यासाठी सतत तिचा पाठलाग करीत होता. तसेच तिच्या मोबाइलवर मेसेज करीत होता. मुलीने आईला याबाबत सांगितल्यावर रविवारी मुलीची आई तरुणाला समजावण्यासाठी गेली होती. यावेळी त्यांनी शिवीगाळ व दमदाटी केली. आरोपी तरुणाविरोधात आचोळे पोलिसांनी विनयभंगासह पोक्सोअंतर्गत गुन्हा दाखल केला आहे.

12) सकाळ पु. पान क्र. 1

## काँग्रेसचा तहसील कार्यालयावर मोर्चा

विरार, ता. ३० (बातमीदार) : केंद्रातील भाजप सरकार नेहमी शेतकरीविरोधी धोरण राबवत आहे. या शेतकरीविरोधी केंद्रातील मोदी सरकारचा तीव्र निषेध करण्यासाठी मोर्चा व निदर्शने करण्यात आल्याची माहिती वसई-विरार शहर काँग्रेस जिल्हाध्यक्ष ओनील आल्मेडा यांनी दिली.

मोदी सरकारच्या दबावाखाली सेबीने (सेक्युरिटीज अँड एक्स्चेंज बोर्ड ऑफ इंडिया) कापूस, सोयाबीन, तांदूळ, गहू, हरभरा व तूर उत्पादनाच्या सौद्यांवर वायदे बाजारात बंदी घातली. त्यामुळे शेतमालाच्या मोठ्या प्रमाणात किमती घसरल्या आहेत. शेतमालाच्या वायद्यावर बंदी घालणे ही कृती सेबीच्या मुख्य उद्देशाला छेद देणारी आहे, असेही आल्मेडा यांनी सांगितले.

CamScanner

सामना

# काशिमीऱ्यात ऑर्केस्ट्रा बारवर पोलिसांची धाड

## तीन मुलींची सुटका

भाईंदर, दि. ३० (सा.वा.) - नियम धाब्यावर बसवत राजरोसपणे सुरू असलेल्या पेणकरपाडा परिसरातील मेमसाब ऑर्केस्ट्रा बारवर काशिमीरा पोलिसांनी धाड टाकली. यावेळी पोलिसांनी तीन मुलींची सुटका केली असून या ठिकाणी सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे सांगण्यात आलेले सीसीटीव्हीही लावले नव्हते. याप्रकरणी हॉटेलमालक, चालकासह ११ जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

काशिमीरा पोलिसांनी बारवर केलेल्या कारवाईत मालक अब्दुल शेख आणि चालक, मॅनेजर पंकज यादव, वेटर आणि ग्राहकांना ताब्यात घेतले. काशिमीरा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. ही कारवाई काशिमीरा पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक हर्षल राऊत, महिला पोलीस उपनिरीक्षक अर्चना जाधव, पोलीस शिपाई सिसोदिया व खंदारे यांच्या पथकाने केली.

Mumbai Edition
Jan 31, 2023 Page No. 7

CS CamScanner

# MBVV sees major dip in drug seizure value in 2022

SURESH GOLANI / Mira Bhayandar



**2021** Raids **54**

Peddlers arrested **86**

Value of drugs seized **₹2.64 cr**

**2022** Raids **54**

Peddlers arrested **69**

Value of drugs seized **₹1.75 cr**

The Mira Bhayandar-Vasai Virar (MBVV) police have witnessed a significant dip in the drug seizure value during raids conducted by its Anti-Narcotics Cell (ANC) in 2022 as compared to 2021. However, the number of raids has remained similar at 54 in both the years.

According to official data sourced from the ANC, their teams under the supervision of former chief Police Inspector Devidas Handore (currently posted as head of the traffic wing) arrested 69 peddlers including 14 Nigerian nationals from January 1 to December 31, 2022, and seized drugs valued at Rs1.75 crore in the international market. The seized consignment includes Mephedrone (MD), cocaine and cannabis like ganja and charas.

In 2021, the ANC arrested 86 people including 13 Nigerian nationals in a similar number of raids and seized drugs valued at more than Rs2.64 crore. All the accused have been booked under the relevant sections of the Narcotic Drugs and Psychotropic Substances (NDPS) Act, 1985 at local police stations in the twin-city.

Apart from acting against the drug mafia, the ANC has also booked 68 people in various offences including gutka vending, usage of tobacco-laced products in hookah parlours and gambling activities in 2022.

The Mira Bhayandar belt was earlier considered a safe hunting ground for the drug cartel, however, after the elevation of the rural policing apparatus to commissionerate status in October 2020, officials trained their focus on weeding out the drug menace from the region, forcing several drug lords to go underground or migrate to other areas.

THE FREE PRESS JOURNAL

CS CamScanner

लोकमत

# सुभाष गोईलकर यांना राष्ट्रपती पदक जाहीर

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला राष्ट्रपती पोलिस पदकांची घोषणा झाली आहे. यामध्ये विरार पोलिस ठाण्यात कार्यरत असलेले पोलिस उपनिरीक्षक सुभाष गोईलकर यांना हा पुरस्कार जाहीर झाला आहे. २६ जानेवारीला आयुक्तालयात आयोजित कार्यक्रमात पोलिस आयुक्त मधुकर पांडेय यांच्या हस्ते त्यांचा सन्मान करण्यात आला.

पोलिस आयुक्तालयाच्या स्थापनेनंतर गोईलकर यांना हा पुरस्कार जाहीर झाल्याने पोलिसांसाठी अभिमानास्पद बाब ठरली आहे. केंद्रीय गृहमंत्रालयाकडून प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येस पोलिस पदकांची घोषणा करण्यात आली. महाराष्ट्र पोलिस सेवेत ७ डिसेंबर १९९१ साली पोलिस कॉन्स्टेबल म्हणून सुभाष गोईलकर



सेवारत झाले होते. १० मार्च २००५ रोजी त्यांना पोलिस नाईक, २५ ऑक्टोबर २०११ रोजी हेडकॉन्स्टेबल, ०१ ऑक्टोबर २०१८ रोजी सहायक पोलिस निरीक्षक, तर ०५ जुलै २०२२ रोजी पोलिस उपनिरीक्षकपदी बढती मिळाली. ३१ वर्षांच्या कालावधीत त्यांना उत्कृष्ट सेवेबद्दल अनेक रिवॉर्ड मिळाले आहेत. विरार पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक राजेंद्र कांबळे व सहकाऱ्यांनी त्यांचा सत्कार करून शुभेच्छा दिल्या. लवकरच राज्यपालांच्या हस्ते पुरस्काराचे वितरण होणार आहे.

Hello Vasai
Page No. 2 Jan 30, 2023
Powered by: erelego.com

CamScanner

1997 से
KAT खबरें आज तक
not a publication of the living media india group
वर्ष: 26 अंक-227 मुंबई, मंगलवार 31 जनवरी 2023 पृष्ठ-12 मूल्य :2.00

# कोंकण शिक्षक निर्वाचन चुनाव शांतिपूर्ण ढंग से हुआ संपन्न

**मुंबई/पालघर:** कोंकण शिक्षक निर्वाचन क्षेत्र के चुनाव के लिए मतदान प्रक्रिया सोमवार को आयोजित की गई थी,इसमें शाम 4 बजे तक वसई तालुका में कुल 80 फीसदी मतदान हो चुका है। मतदान के समय एमबीवीवी पुलिस की व्यवस्था चुस्त-दुरुस्त दिखाई दी ।ज्ञात हो कि पालघर, ठाणे,रायगढ़,रत्नागिरी,और सिंधु दुर्ग शिक्षक निर्वाचन क्षेत्र के पांच जिले हैं ।कोंकण शिक्षक निर्वाचन क्षेत्र का चुनाव सोमवार को हुआ था, इसमें मतदाताओं की संख्या 37,719 दर्ज की गई,और मतदाताओं की सबसे अधिक संख्या ठाणे जिले में 14,683 दर्ज की गई है, सिंधुदुर्ग में सबसे कम 2,164 दर्ज किया गया। पालघर जिले में 6,718 और वसई तालुका



में 3,642 मतदाता हैं,इसलिए सारी गणना वसई के इसी मत पर आधारित थी।लिहाजा वसई में सोमवार को हुई इस मतदान प्रक्रिया में शाम चार बजे तक कुल 80 फीसदी मतदान दर्ज किया गया,और कुल 3 हजार 7 मतदाताओं ने मतदान किया। इसमें 78 प्रतिशत महिला मतदाता जबकि 90 प्रतिशत पुरुष मतदाता शामिल हैं,हांलाकि,मीरा भाईंदर वसई विरार पुलिस आयुक्तालय के तहत 6 मतदान केंद्र थे, दो मतदान केंद्र विरार, दो मतदान केंद्र वसई, एक मतदान केंद्र अरनाला और एक मतदान केंद्र भाईंदर था,विरार में मतदान केंद्र पर 84ℨ,वसई के मतदान केंद्र पर 81ℨ,अर्नाल मतदान केंद्र पर 75ℨ,भाईंदर के मतदान केंद्र पर 85ℨ , इस तरह 4 चार बजे शांतिपूर्ण ढंग से मतदान संपन्न हुआ।

CS CamScanner

# वाहतूक पोलिसाने वाचवले अनेक वाहनचालकांचे प्राण

**आपलं महानगर वृत्तसेवा**

**भाईंदर ।** मीरारोड पूर्वेच्या प्लेझंट पार्क परिसरात काशिमिराकडून भाईंदरकडे जाणाऱ्या मुख्य रस्त्यावर हाटकेश भागात तेल सांडल्या मुळे त्यात दुचाकीस्वार घसरून पडत असल्याची घटना सकाळी १० च्या सुमारास घडली होती. या घटनेची माहिती हाटकेश नाक्यावर कर्तव्य बजावत असणाऱ्या काशिमिरा वाहतूक शाखेचे पोलीस पोलीस शिपाई पंकज ठाकुर यांना मिळताच त्यांनी तत्परता दाखवत त्यांच्या सोबत असलेले ट्राफिक वॉर्डन व जवळच सुरु असणाऱ्या मेट्रोच्या कामातील काही कामगारांच्या मदतीने रस्त्यावर सांडलेल्या तेलावर माती टाकली. रस्त्यावर तेलामध्ये घसरून पडल्याने काहींना किरकोळ दुखापत झाली आहे.

रस्त्यावर पडलेल्या तेलामुळे पुन्हा कोणी घसरून पडू नये याकरिता पंकज ठाकुर यांनी महापालिकेच्या अग्निशमन दलाला फोन करुण सदरची माहिती देताच अग्निशमन दल घटनास्थळी हजर होत रस्ता पाण्याने धुवून स्वच्छ करण्यात आला. वाहतूक पोलीस कॉन्स्टेबल पंकज ठाकुर यांनी दाखवलेल्या माणुसकीमुळे सांडलेल्या तेलामुळे पुढे मोठ्या प्रमाणात होणारे अपघात टळले. यामळे त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

CS CamScanner

# MBVV cops help rescue 'distressed' job aspirant stuck in Oman since Aug

SURESH GOLANI
NAVI MUMBAI

The special cell (passport division) of the Mira Bhayandar-Vasai Virar (MBVV) police helped rescue a 30-year-old woman from Vasai who had left for Muscat in Oman on Aug 25 for a job opportunity obtained through an agent. However, the woman was facing difficulties and wanted to return. Her mother registered a complaint with the police on Jan 4, after the agent refused to hand over her passport and visa.

A team from the special branch established contact with officials attached to the Embassy of India in Muscat (Oman) seeking help in providing asylum to the woman in distress and for her safe return. The embassy officials responded positively and contacted the visa sponsor immediately. After completing all legal formalities like cancellation of the visa in the labour court, the woman was safely sent back to India and reunited with her family on Jan 9.

**The woman's mother registered a complaint with police on Jan 4**

The MBVV police has earlier helped rescue a 25-year-old victim of domestic violence from Central Africa, a couple from Kuwait and also in bringing back an 18-year-old domestic help who was stuck in Dubai.

CamScanner

# MBVV cops net ₹5cr as traffic fines in 2022

SURESH GOLANI
MIRA-BHAYANDAR

The traffic control department (Kashimira wing) of the Mira Bhayandar-Vasai Virar (MBVV) police has collected a whopping Rs5.09 crore as fines from 1,24,476 motorists who were involved in various traffic-related offences last year.

According to traffic department statistics, motorists caught driving without seat belts topped the list with 27,465 cases (Rs54.91 lakh) followed by 2,334 helmetless bik-[illegible]



(Rs4.95 lakh) caught driving or riding under the influence of alcohol. Other violations include parking vehicles in no-parking spots, creating traffic snarls, rash driving, jumping signals, triple seat bike riding and speeding. Additionally, 2,724 people were found driving without licenses and slapped with fines amounting Rs1.35 crore.

"Our drives and special awareness campaigns under the supervision of Commissioner Madhukar Pandey and other senior officials will continue throughout the year to encourage motorists to follow traffic rules," said newly appointed chief of traffic (Kashimira unit) police inspector Devidas Handore. Meanwhile, unpaid fines amount to another Rs1.22 crore, taking the total amount of penalties to Rs6.32 crore.

As a part of the 'one state, one e-challan' initiative which aims to integrate traffic law enforcement across the state, the traffic police personnel are armed with e-challan devices supported by a global positioning system (GPS) feature which enables the e-challan system to collect fines from traffic rule violators on the spot.

Apart from imposing penalties, the traffic police have also sent a proposal to the Regional Transport Office (RTO) recommending the suspension of driving licenses of 1,431 people for frequently violating the Motor Vehicles Act.

THE FREE PRESS JOURNAL
Tue, 17 January 2023
https://epaper.freepressjournal.in/c/71438878

CamScanner

लोकमत

# घरफोडी करणाऱ्या सराईत आरोपीला अटक

## गुन्हे शाखेच्या युनिट-३ ची कामगिरी

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : दिवसा घरफोडी करणाऱ्या सराईत आरोपीला अटक करण्यात गुन्हे शाखेच्या युनिट-३ च्या पोलिसांना यश मिळाले आहे. आरोपीकडून १४ गुन्ह्यांची उकल करून लाखोंचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

विरारच्या फुलपाडा येथील श्री साई गणेश अपार्टमेंटमध्ये राहणाऱ्या रुक्मिणी गोवेकर (३१) यांच्या घरी २१ जानेवारीला चोरट्याने दरवाजाचा कडीकोयंडा उचकटून आत प्रवेश करत सोन्याचे दागिने व रोख रक्कम असा २८ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला होता. या गुन्ह्याचा तपास वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या आदेशान्वये गुन्हे शाखेच्या युनिट-३ कडे वर्ग करण्यात आला होता. पोलिस उपायुक्त, सहायक पोलिस आयुक्त यांनी दिलेल्या सूचना व मार्गदर्शनाप्रमाणे पोलिस पथकाने गुन्ह्याचे तांत्रिक विश्लेषण व गुप्त बातमीदाराकडून गोपनीय माहिती प्राप्त करून आरोपी अक्रम फारुक अन्सारी (२४) याला २३ जानेवारीला अटक केली. ही कामगिरी पोलिस उपायुक्त (गुन्हे) अविनाश अंबुरे, सहाय्यक पोलिस आयुक्त (गुन्हे) अमोल मांडवे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक प्रमोद बडाख, पोलिस उपनिरीक्षक उमेश भागवत यांच्या पथकाने पार पाडली.

### मुद्देमाल हस्तगत

पोलिस कोठडीदरम्यान आरोपीकडे कौशल्यपूर्वक तपास करून गुन्ह्यात वापरण्यात आलेले वाहन, सोन्या-चांदीचे दागिने, मोबाईल असा २ लाख ८९ हजार ५५० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला असून १४ गुन्हे उघडकीस आले आहे. आरोपीविरोधात वसई, विरार परिसरातील विविध पोलिस ठाण्यांत घरफोडीचे १० गुन्हे दाखल आहे.

CS CamScanner

आपलं महानगर | My महानगर.com

# सेक्स रॅकेट चालवणारी टोळी अटकेत

भाईंदर । मीरा -भाईंदर परिसरात सेक्स रॅकेट चालवणाऱ्या मुंबई मालाडमधील मालवणी येथील एका महिलेला तिच्या साथिदारासह अटक करण्यात आली आहे. तपासात या दोघांसह आणखी दोनजण मिळून ही टोळी सेक्स रॅकेट चालवत असल्याचे उजेडात आले आहे. यावेळी एका पिडीत महिलेची सुटका करण्यात आली आहे. मालाडच्या मालवणी येथे राहणारी जीनत खान ही महिला सेक्स रॅकेट चालवत असल्याची माहिती अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाला मिळाली. पोलिसांनी बोगस गिऱ्हाईक पाठवून एका मुलीची मागणी केली होती.

AaplaMahanagar Edition
Jan 31, 2023 Page No. 3
Powered by : eReleGo.com

CamScanner